International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 18 March - April - 2025

# शेतकऱ्यांसाठी डॉ. आंबेडकराचे केलेले कार्य

डॉ. आर. यु. हिरे

*Corresponding Author – डॉ. आर. यु. हिरे*

**DOI - 10.5281/zenodo.15240954**

मानव मुक्तीचा लढा या देशात अनेक समाज सुधारकांनी उभा केला. पण त्यापैकी डॉ. आबेंडकरांनी सुरू केलेला लढा अतिशय महत्वाचा ठरला.कारण त्यांच्या अथक परिश्रमामुळे येथील सर्वच घटकांना न्याय मिळाला हे नाकरता येणार नाही. हजारो वर्ष गुलामगिरीत जखडलेल्या दलित, पददलित शोषीत जनतेला मुक्तीचा मार्ग दाखविणारे डॉ. आंबेडकर दीपस्तंभ होते. त्यांनी स्त्रियांना गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी सुधारणावादी कायदे तयार केले. सामाजिक, आर्थिक,राजकीय शैक्षणिक, धार्मिक,सांस्कृतिक , औद्योगिक अशा सर्व क्षेत्राविषयी त्यांची ठाम मते होती. त्या सर्व क्षेत्रामध्ये सुधारणा घडविण्यासाठी त्यांनी अथक परीश्रम केले. राजकीय स्वातंत्र्याला सामाजिक समतेची जोड देवून खऱ्या मानवमुक्तीचा ध्यास घेणाऱ्या भारतीय नेत्यांच्या थोर परंपरेचे डॉ.आंबेडकर हे मुकूटमणी आहेत. देशातील तमाम वंचित व शोषितांसाठी डॉ. आबेंडकरांनी कार्य केले. खास करून शेतकरी, शेतमजुर व महिलांच्या प्रश्नची विशेष चिकित्सा करून त्यांनी त्यावर उपाय सुचविले. परंतु त्यांच्या कृषिविषयक विचारांची दखल तत्कालीन राजकीय नेत्यांनी घेतली नाही.

राष्ट्रीय दृष्टीकोणातून डॉ. आबेंडकरांनी शेतकऱ्याच्या हिताकरीता बरीच कामे केली आहेत. जमीन सुधारणा कायदा व राज्याचा आर्थिक विकास यावर त्यांनी प्रभावीपणे चळवळ उभी केली. या विषयीचे त्यांचे विचार देशाला आणि शेतकऱ्यांना सक्षम करणारे आहेत, परंतु त्यंच्या या महत्वपुर्ण विचारांकडे इथल्या व्यवस्थेत जाणीवपुर्वक दुर्लक्ष केल्याने देशात शेतकऱ्यांच्या आत्महत्येच सत्र सुरू आहे.

प्राचीन काळापासुन ते आज पर्यन्त भारत देश हा कृषीप्रधान देश आहे. परंतु शेतकऱ्यांची स्थिती आतिशय वाईट आहे. अपार कष्ट केल्यानंतरही शेतकऱ्यांना दोन वेळचे जेवण पोटभर मिळत नाही. ग्रामीण भागात शिक्षणाच्या पुरेशा सुविधा नसल्यामुळे शेतकऱ्यांच्या मुलांना चांगले शिक्षण मिळत नाही. नैसर्गिक आपत्ती,सरकारी धोरण यामुळे शेतीचे उत्पन्न वाढत नाही. परिणामी शेतकरी कर्जबाजारी झालेला आहे. तो सावकारी पाशात अडकलेला आहे. अशा गांजलेल्या शेतकऱ्यांची अवस्था पाहून डॉ. आबेंडकरांनी चे अंत:करण खुप दु:खी होई. शेतकऱ्याचं जीवन सुधारावं त्यांना सुख मिळावं म्हणून ते प्रयत्नशील होते. डॉ. आबेंडकरांनी १९१८ मध्ये भारतातील अल्प भुधारक हा निबंध लिहीला. त्यातून शेतीच्या अर्थशास्त्रावर त्यांनी भर दिला. डॉ. आबेंडकरांनी च्या मते अल्पभूधारकांच्या कमी उत्पादनाचा मोठा दोष कोणता असेल तर तो भारताची सदोष सामाजिक अर्थव्यवस्था होय. या निबंधातून त्यांनी अल्पभुधारक, मजूर खोतीपट्टी, महार वतन, जमीन महसूल, वहिवाटीचा प्रश्न , सामुदायिक शेती या विषयावर विचार मांडले.

डॉ. आबेंडकरांनी नी आपले संपुर्ण आयुष्य हे समाजाच्या उत्थानासाठी खर्ची केले. जीवनभर ते स्वत:ला विद्यार्थी समजत आणि त्यांनी विविध प्रश्नांवर अभ्यास, चिंतन करून अनेक प्रश्नांची सोडवणूक केली. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर त्यांनी सातत्याने चिंतन, मनन केले. त्यासाठी त्यांनी वेळोवेळी भुमिका घेतल्या, चळवळी केल्या. त्यांच्या भूमिकांच, त्यांच्या चळवळीचं त्यांच्या आचार विचाराचं , तत्वज्ञानाच केंद्रबिंदू शेतकरी होते.शेतकऱ्यांच्या दैन्य संपले पाहिजे, त्यांच्या जीवनात

बदल घडला पाहिजे असे त्यांन वाटत असे म्हणून त्यांनी शेतसारा, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न, पाण्यावरील कर, खोती पध्दती, अल्पभूधारक सावकाराकडून होणारी पिळवणूक , शेतसाऱ्यांच्या वसूलीकडे शेतकऱ्यांची बनत चाललेली नाजूक अवस्था आणि शेतीवर वाढत चाललेला सतत र्जाचा बोजा यासाठी डॉ.आबेंडकरांनी अनेक चळवळी उभारल्या. शेती आणि शेतकरी यांच्या प्रश्नाकडे अनेकदा सत्ताधाऱ्यांचे लक्षही वेधून घेतले. शेतकऱ्यांचे कमालीचे शोषण करणारी खोती पध्दती त्या काळी कोकणात अस्तित्वात होती.

खोतांच्या जुलगी सत्तेचा जाच कोकणातील शेतकऱ्यांना सहन करावा लागे. हे खोत अनेक प्रकारांनी कुळाकडून पैसे उकळत. कोकणातील शेतकऱ्यांनी जाचक असलेली खोती पध्दत नष्ट करण्यासाठी डॉ. आबेंडकरांनी लढा दिला. १९०५ ते १९३१ या काळात पेण, वाशी , पोलादपुर , चिपळूण , माणगांव, महाड, खेड, तळा, रोहा इत्यादी गावात अनेक सभा झाल्या. दि. १३ एप्रिल १९२९ रोजी चिपळून येथे शेतकऱ्यांच्या झालेल्या एका सभेत अध्यक्षस्थावरून बोलतांना डॉ. आबेंडकरांनी म्हणाले, अस्पृश्यांचे रक्त शोषण करणाऱ्या खोती पध्दतीचे उच्चाटन करण्याकरीता आपण पडतील ते श्रम घेणार आहोत. खोतीच्या जाचातून ज्यांना मुक्तता करून घ्यायची असेल त्यांनी स्थलांतर करावे, त्यांच्यासाठी एखाद्या दुरच्या संस्थानात लागवडीकरीता जमिनी मिळवून देण्याचा आपण प्रयत्न करू, खोती तुमच्या रक्ताचे शोषण करीत आहे. ही खोताची पध्दती नष्ट केली पाहिजे. तसे झाले तर तुम्हाला शांतता व समृध्दी लाभेल. तुमचे ध्येय गाठण्यासाठी ही चळवळ तुम्ही अशीच चालू ठेवली पाहिजे. चार — पाच वर्षांनी भारताच्या हाती आपल्या भवितव्याची सर्व सूत्रे मिळविण्याचा संभव आहे. त्यावेळी तुम्ही तुमचे खरे प्रतिनिधी विधीमंडळावर पाठविण्याची दक्षता घ्या. जे उमेदवार खोती पध्दतीच नायनाट करण्यास निष्ठेने झटतील अशानाच तुम्ही निवडून दया.

खोतांचा हादरा देण्यासाठी कोकणातील शेतकऱ्यांनी १९३३ ते १९३९ पर्यंत संप पुकारला. या संपात १४ गावाचे शेतकरी सहभागी झाले. भूधारकांमध्ये खोताविषयी असंतोष पसरू लागला. खोती पध्दती नष्ट झाली पाहिजे असे त्यांना वाटू लागले. त्यामुळे खोत आणि भूधारक यांच्यातील संबंध इतके विकोपाला गेले की, भूधारकांनी तीन खोतांन ठार मारला आणि शांतता धोक्यात आणली. या पार्श्वभुमीवर डॉ. आबेंडकरांनी खोती पध्दती लवकरात लवकर नष्ट करण्याची मागणी केली होती. खोती अंताचं विधेयक त्यांनी सादर केल. त्यामुळे शासन आणि भूधारक यांच्यात थेट संबंध प्रस्थापित होणार होता. हे खोती अंताच विधेयक म्हणजे स्वतंत्र भारतातील जमीन सुधारणाविषयी कायदयाची पाऊलवाट होय.

शेती ही शासनाची मालमत्ता आहे आणि शेतकरी हा कब्जेदार आहे, हे डॉ.आबेंडकरांना कधीच मान्य नव्हते. ते शेतसारा वसूलीला नेहमीच विरोध करीत असतं. ते म्हणतं, देशातील उत्पन्नाचा विचार न करताच शेतसारा लावला जातो ही पध्दत चुकीची आहे. यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडतो. ही शेतसारा पध्दती बंद व्हायला हवी. शेतकऱ्यांच्या आकारणीसाठी ब्रिटीशांनी नेमलेल्या कमिटीची त्यांनी भेट घेवून सक्ष देण्याची इच्छा व्यक्त केली परंतु त्यांची साक्ष टाकळी. १८ ऑगष्ट १९१५ रोजी दै. केसरी मध्ये एक लेख लिहून शेतसारा आकारणी ही केवळ काल्पनिक उत्पन्नाच्या अंदाजावरून करण्यात येते. ती अन्यायकारक व गैर आहे असे प्रतिपादन त्या लेखात मांडले. २४ फेब्रुवारी १९२७ रोजी मुंबई कॉन्सीलच्या विधीमंडळातही त्यांनी अर्थसंकल्पीय भाषणात शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर विस्तृत मांडणी केली.

शेतातुन उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीकोणतुन डॉ. आंबेडकरांनी मोठया नदयावर धरणे बांधण्याची संकल्पाना मांडली त्याचा परीणाम आज जी भाकलानांगर सारखी धरणे दिसत आहे ती आंबेडकरांच्या विचाराने त्या धरण

भारतातील लहान धरणक्षेत्र आणि त्यावरील उपाय हा डॉ.आबेंडकरांनी लेख म्हणजे भारताच्य शेती प्रश्नावरील अत्यंत मुलभूत स्वरूपाचा भाष्य आहे. डॉ. आबेंडकरांच्या मते जमिनीच्या विभाजनाचा मुख्य कारण म्हणजे जमिनीवर पडत असलेला लोकसंख्येचा प्रचंड भार होय. जमिनीच्या लहान लहान तुकडयांवरून काही ना काही फायदा होणे हेच लहान धरणक्षेत्रांच्या समस्येचं उगम स्थान आहे. जमिनीचे तुकडीकरण थांबण्यासाठी व उत्पादकता वाढविण्यासाठी शेतावर आधारित लोकसंख्या उद्योगधंदयाकडे वळविली पाहिजे असे त्यांचे मत होते. भारतातल्या शेतीची समस्या सोडविण्यासाठीचा मार्ग म्हणून डॉ.आबेंडकरांनी सहकारी शेतीचा पुरस्कार केला. याविषयी डॉ.आबेंडकरांनी म्हणतात, सहकारी शेतीमुळे

शेतकऱ्यांच्या जमिनीवरील मालकी हक्क अबाधित राहील. छोटया शेतकऱ्यांना विनाशापासून वाचवता येईल. आर्थिक लोकशाहीच स्वप्न साकार करण्यासाठी डॉ.आबेंडकर कृषी क्षेत्रात शासन संस्थच्या हस्तक्षेपाचं समर्थन करतात. शेती हा शासकीय उद्योग असावा.

कृषीप्रधान देशातील शेतकऱ्यांविषयी कळकळा असणाऱ्या डॉ.आबेंडकरांनी शेतकऱ्याविषयी केवळ विचार मांडले नाही तर प्रत्यक्षात कृतीही केली. भारतीय संविधान लिहतांना कृषी विषयक व शेतकऱ्यांच्या कल्याणावर चर्चा होत असतं. शेतकरी नेते डॉ. भाऊसाहेब देशमुख शेतकऱ्यांच्या हिताच्या कल्पना व प्रस्ताव मांडत. त्या प्रस्तावांना डॉ.आबेंडकरांनी कायदयाचे स्वरूप दिले. डॉ.आबेंडकरांनी भारतीय राज्यघटनेच्या कलम ३२३ (ब) अंतर्गत शेतकऱ्यांसाठी खास लवाद निर्माण करण्याची तरतुद केली. या लवादाच्या माध्यमातून शेतकरी आपल्या मालाचा भाव स्वत:च ठरवू शकतो. कमी भाव मिळाला तर न्याय मागू शकतो. परंतु आतापर्यंत या देशात शेतकऱ्यांसाठी एकही लवाद निर्माण करण्यात आला नाही ही भारतीय शेतकऱ्यांचे दुदैव आहे. डॉ. आबेंडकरांनी शेतकऱ्यांच्या हिताकरीता बरीच कामे केली. कृषी क्षेत्रातील त्यांचे योगदान अत्यंत महत्वपुर्ण आहे. त्यांचे कृषीविषयक विचार या देशाला आणि शेतकऱ्यांना सक्षम करणारे आहेत. परंतु डॉ.आबेंडकरांच्या या विचारांकडे दुर्लक्ष झाले आहे. डॉ.आबेंडकरांच्या कृषीविषयक विचारांची व धोरणांची अंमलबजावणी व्यवस्थित झाली असती तर देशातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या नसत्या. अन्नदात्यावर उपाशी राहण्याची वेळ आली नसती.

**संदर्भ:**


१) जाधव रोहीदास, कृषिक्षेत्राचा हितचिंतक (वृत्तपत्रातील लेख) दै. पुण्यनगरी – १९ जून २०१६

२) जोगदंड बबन,शेतकरी हिताचा पोशिंदा (वृत्तपत्रातील लेख) दै. पुण्यनगरी – २२ मे २०१६

३) सरकुंडे माधव , बाबासाहेब आणि शेतकरी (वृत्तपत्रातील लेख) दै. लोकमत – १४ एप्रिल २०१६

४) धनंजय किर , डॉ. बाबासाहेब आबेडकर, पाप्युलर प्रकाशन मुंबई चौथी आवृत्ती

५) टेंभूर्णे योगानंद, प्रज्ञापथ धम्मचक्र प्रवर्तन दिन विशेषांक २००७

६) दांडगे जा.ना,बुलढाणा पत्रिका(साप्त) जुलै १९९८

७) डोंगरे मधुकर,जयभिम ( साप्त ) आगष्ट १९९८